REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# कथकनृत्य कला-शिक्षणाचे बदलते संदर्भ

विदुला रा कुडेकर
संशोधिका- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

**ABSTRACT -**
व्यक्ती-विकासाचा आलेख जसा काळानुसार बदलत गेला त्यामुळे कथक नृत्यकलेचा उद्देश आणि कलाशिक्षणाचे संदर्भही बदलत गेले.



**KEYWORDS-** कथकनृत्य, परंपरा, व्यक्ती-विकास

(हा लेख प्रबंधासाठी केलेल्या प्रकल्पाचा एक भाग आहे. ह्या संशोधनासाठी पुण्याच्या शहरीभागातील मध्यमवर्गीय, वाढीच्या वयातील महत्वाच्या (१० वर्षे ते १८ वर्षे ) टप्प्यात विविध नृत्यवर्गातून छंद म्हणून कथक नृत्य शिकणाऱ्या १४४ मुली आणि ह्याच विभागातील विविध शाळा/कॉलेज मधील कथक न शिकणाऱ्या १४६ मुली अश्या दोन्ही मिळून एकूण २९० मुलींच्या चार विविध चाचण्या घेतल्या गेल्या. सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाच्या पैलूंपैकी शारीरिक विकास, बौद्धिक विकास, भावनिक विकास आणि मानसिक विकास ह्या वैशिष्ट्यांच्या चाचण्या घेतल्या. २९० मुलींवर घेतलेल्या चाचण्यांच्या आधारे जे निष्कर्ष निघाले त्यावर आधारित हा लेख आहे.)

## परिचय-

कुठल्याही कलेला समारंभाचे स्वरूप आहे आणि कौशल्य हि कलेची निकड आहे. कलेसाठी लागणारे कौशल्य घरगुती पातळीवर किंवा व्यावसायिक पातळीवर आत्मसात करावे लागते. भारतीय कथकनृत्य प्रशिक्षणाला जे संदर्भ आहेत त्याने कथकनृत्य कलेचे स्वरूप ठरते. प्राचीन काळापासून भारतात घराघरातून धार्मिक विधीला अनुलक्षून (आरत्या,फुगड्या) येणारे प्रयोग, जनजीवनाच्या व्यवहारात सहभागी (लेझीम ,मिरवणुका) होणारे प्रयोग, तसेच सादरीकरणाचे(कीर्तन,पोवाडा) प्रयोग होत असत, आजही होतात. परंतु त्याचे प्रशिक्षण घरगुती असे आणि वाढीच्या वयात सुरु होत असे. कलेचे स्वरूपहि घरगुती असे, त्याला कलात्मक सादरीकरणाचा पैलू नसे आजही नाही. आज उत्तर भारतीय शास्त्रीय कथक नृत्य सादरीकरणाची स्वायत्त कला म्हणून आपल्याला दिसते, त्याचा अभ्यासक्रमहि दिसतो, ती व्यावसायिक पातळीवर दिसते, परंतु तीही थोड्याफार फरकाने ह्याच मार्गाने विकसित झालेली दिसते. त्यामुळे आजच्या जागतिकीकरणामध्ये कथकनृत्य कला-शिक्षणाचे महत्व जाणून घेण्याच्या संदर्भात तिच्या काळानुसार बदलत्या तीन कालखंडांचा विचार करणे आवश्यक आहे.

## मंदिर परंपरा-

प्राचीन काळापासून गावागावातील मंदिरे धार्मिक श्रद्धांच्या भोवती असलेल्या समाज व्यवहाराची ठिकाणे होती. त्यामुळे तिथेहि साहजिकच विविध कलांना प्रोत्साहन मिळत असे. देवाला साक्षी ठेऊन किंवा धार्मिक समारंभातून अनेक

कला, विशेषतः संगीतकला मंदिर परिसरात विकसित झालेली दिसते. कथक नृत्याची उत्पत्ती आणि इतिहास(१) बघितला तर आदिकाळ ते १० व्या शतकापर्यंतच्या कथकच्या इतिहासात कुशीलव, चारण, राजस्थानातील ढोल, उत्तर भारतातील भाट, कथिक, हरिकथा-गायक, ह्यांच्या एकत्रित धारेतून कथक विकसित झालेले दिसते. ह्या कलाकारांना गायन,वादन,नृत्य, निरुपण, सूत्रधार, अभिनय असे सगळे येत असे. ते स्वतःच मंदिरात हरिकथा सांगत, कधी गावोगाव भटकत कीर्तने करीत. हळूहळू काळाच्या ओघात कीर्तना बरोबर छोटे छोटे प्रसंग सादर करण्यासाठी आपल्या शिष्यांची, मुलांची मदत घ्यायची आणि कीर्तन अधिक फुलवायचे, थोड्या नंतरच्या काळात नर्तनाला प्राधान्य देऊन साथीदारांकडून गायन,वादनाची मदत घ्यायची आणि आज तर नर्तकी पूर्णपणे साथीदारांवर आणि/किंवा रेकॉर्डेड संगीतावर अवलंबून राहिलेली दिसते, ह्या प्रक्रियेतून कथक विकसित झालेले दिसते. प्राचीनकाळी हे कथिक कधी राजाच्या संगीत शाळांमध्ये, कधी राजकन्यांना, कधी मंदिरातील देवदासींनाहि शिकवीत. देवदासी स्त्रियांना त्यांच्या वाढीच्या वयापासून मंदिरामध्ये जी नृत्य कलाशिक्षणाची व्यवस्था होती ती देवासमोर, देवासाठी आणि देवळात येणाऱ्या भाविकांसाठी सादर करण्यासाठी होती आणि ती तेवढ्यापुरतीच मर्यादित होती. त्यातूनच त्यांची कला फुलत होती. रामायण, महाभारत, पुराणातील कथांचा संदर्भ आणि त्यातील प्रेक्षकांचा सहभाग ह्यातून त्यांची नृत्यकला विकसित होत गेलेली दिसते. देवदासींना सामाजिकरित्या प्रतिष्ठेची वागणूक जवळजवळ नव्हतीच. त्यांचा आश्रय, बिदागी देवळाच्या आर्थिक व्यवहाराशी निगडीत होती. नृत्यकलेचे स्वरूपहि त्यामुळे धार्मिक, अध्यात्मिक, दैवी, ईश्वराप्रती जाण्याचा मार्ग ह्यानेच वलयांकित राहिले होते.

त्यामुळे आवर्जून, विचारपूर्वक नृत्याच्या क्षेत्रात आलेल्या स्त्रियांची संख्या अगदीच नगण्य, जवळजवळ नव्हतीच.

नाट्यशास्त्र(पाहिले ते तिसरे शतक) आणि त्या नंतरच्या मध्य युगीन (अभिनय दर्पण वगैरे,नाट्यशास्त्रावर आधारित) ग्रंथातून नृत्याचे विविध आयाम दिलेले आहेत(२) कलाकाराच्या प्रशिक्षणासाठी आंगिक,वाचिक, आहार्य आणि सात्विक अभिनयाबरोबर रस प्रक्रिये विषयी विस्तृत माहिती विशेष करून नाट्यशास्त्रात दिलेली आहे. प्रत्यक्ष गुरुशिष्य परंपरेतील नृत्य-प्रशिक्षणातहि कलाकाराला प्राधान्य दिसून येते. शिकणाऱ्याला उत्तम कलाकार घडवण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात(३) प्रत्यक्ष प्रयोग शिकवला जात असे. त्यामुळे बहुतेक सर्व ग्रंथातून संज्ञात्मक माहिती दिलेली आहे. त्या शास्त्रावर हुकमत, सादरीकरणातील सफाई आणि देवादिकांच्या कथांच्या चौकटीतील सृजनशीलतेच्या विकासाच्या संधी कलाकाराला दिल्या गेल्या.

नाट्यशास्त्राच्या काळापासून (पहिले ते तिसरे शतक) ते जवळजवळ पुढे हजार वर्षे त्याचा प्रभाव समाजावर दिसतो. कलेच्या प्रेक्षकांना नाट्यशास्त्राची जाण आहे हे गृहीत धरून बहुतेक संस्कृत काव्यावर नाट्यशास्त्राचा प्रभाव दिसतो, म्हणजे प्रेक्षकांनाही प्रशिक्षण दिले गेले.

परंतु त्यात सर्वसामान्यांना कला-शिक्षणाचे वैयक्तिक फायदे होतात का, म्हणजेच कलेची उपयोजिता ह्या विषयीचा विचार निदर्शनास येत नाही.

## दरबार परंपरा-

मुस्लीम आक्रमणानंतर मंदिरातील अनेक देवदासी दरबारात राजनर्तकी म्हणून रुजू झाल्या. दरबारपरंपरेत नर्तकीने उच्चप्रतीच्या कलेचे आणि त्यातील कलात्मकतेचे दर्शन दरबारी रसिक प्रेक्षकांना घडवावे. मंदिर परंपरेतील दैवी शृंगार रस दरबार परंपरेत मानवी पातळीवर आणून(ठुमरी, गझल) त्या आधारे दरबारातील उच्च पदास्थांचे मनोरंजन करावे हा कथकनृत्य कलेचा उद्देश होता. म्हणजे जी स्त्री नृत्यकलेत प्राविण्य दाखवते ती नर्तिका कलाकार होत असे, राजनर्तिका होत असे, तिची बिदागी जास्त असे. कलाकार व्हायचे असेल तरच कला शिकावी(४), कलेवर गुजराण करावी. नर्तकींचे प्रशिक्षण गुरु-शिष्य परंपरेतून होत असे. ते मुलींच्या वाढीच्या वयात सुरु होत असे. शिष्याची निवड आणि त्यांची तालीम,रियाझ अतिशय कठोर मार्गाने होत असे. हे प्रशिक्षण कथक नृत्यातील लय-तालावरची आणि तंत्रावरील हुकमत आणि त्यातील स्पर्धा, सादरीकरणातील सफाई आणि त्यामुळे मिळालेली राजाची मर्जी ह्या आयामांवर ठरत होते. ज्या नर्तकी दरबारात पोचत नसत त्यांना कोठीवर जाण्याची एक समांतर सोय होती. त्यात प्रशिक्षणापासून ते सादरीकरणापर्यंतची उतरंड दिसून येते. त्यामुळे ह्या काळात गुरूंची घराणेशाही आणि वारसा हक्क ह्या परिघात कथक

नृत्याचा विकास झालेला दिसतो. नर्तकींना दरबारात/कोठीवर मानाचे स्थान असले तरी एकूण समाजात अत्यंत हीन वागणूक होती. त्यामुळे ह्या दरबारी कलेमध्ये येणाऱ्या नर्तकी नाईलाजास्तव ह्या क्षेत्रात येत असत. बहुतेक जणी वारसा हक्कानेच ह्या क्षेत्रात येत असत.

मुद्दाम विचारपूर्वक, आवड म्हणून नृत्याचे क्षेत्र निवडण्याची संधी स्त्रियांना नव्हती. त्यामुळे कलेचा अर्थार्जनाशिवाय दुसरा काही उपयोग होऊ शकतो ह्याचा विचार ह्या काळात केला गेला नाही.

### रंगमंच परंपरा-

ब्रिटीश अंमलापासून एकूण भारतीय कलेचा ऱ्हास दिसतो. २० व्या शतकाच्या प्रारंभी अनेक संस्थाने खालसा झाल्या नंतर अनेक दरबारी नर्तकी दरबार सोडून शहरात यायला लागल्या आणि त्यांनी कथक नृत्याला भक्तीचे स्वरूप द्यायला सुरवात केली(५). त्यामुळे कलेचे प्रशिक्षण गुरु-शिष्य परंपरा, कठोर परिश्रम, भारतीय अध्यात्म, कलेची दैवी देणगी, ईश्वराप्रती जाण्याचा मार्ग, कलेचा साक्षात्कार, ह्याने पुन्हा एकदा वलयांकित झाली. आत्मविष्कार, कलात्मकता, कलाकृती, कलेची प्रतिभा हा सर्वस्वी कलाकाराचाच प्रांत राहिला.

त्यात पुन्हा एकदा सर्वसामान्यांनी कलेचे प्रशिक्षण घ्यावे हा विचार केला गेला नाही.

परंतु २० व्या शतकाच्या पूर्वार्धात उदय शंकर, रामगोपाल, मादाम मेनका ह्यांनी जसे नृत्यकलेकडे आधुनिक/पाश्चात्य नजरेने बघायला सुरवात केली तसेच पलुस्करादी तज्ञांनी कला-प्रशिक्षणाकडे आधुनिक/पाश्चात्य नजरेने बघायला सुरवात केली. रवींद्रनाथ टागोर, गांधीनी भारतीय साहित्य, कला मुलांच्या व्यक्ती विकासाचा भाग करायचा प्रयत्न केला, शांतीनिकेतन, सेवाग्राम मधील अभ्यासक्रमात त्यांनी संगीत, चित्रकलेला महत्त्व दिले.

स्वातंत्र्यानंतर नेहरूंनी हा विचार आधुनिकतेशी जोडण्याचा प्रयत्न केला आणि सरकारी धोरण म्हणून नाट्यकला अकादमी सारख्या संस्थांची स्थापना केली. त्यामुळे शहराशहरातून अनेक नर्तकी कथक नृत्य शिकू लागल्या, नृत्यामधील उत्तानपणा पूर्ण काढून टाकायला त्या यशस्वी झाल्या आणि मग 'सुशिक्षित/चांगल्या घरातील' मुली कथक नृत्य शिकायला लागल्या. घराणेदार कथक नर्तकांकडून कथक नृत्य शिकून ह्या मुली/स्त्रिया स्वतः कलाकार/शिक्षिका/अभ्यासक/संरचानाकार होऊ लागल्या(५) आणि कथक नृत्य सर्वसामान्यांना उपलब्ध झाले. त्यामुळे कथक नृत्याला 'करमणूक व्यवसाय'(श्यामला वनारसे) म्हणून सामाजिक आणि आर्थिक पाठबळ मिळाले. रंगमंचावर कला सादर करताना काही प्रमाणात प्रेक्षकांचा विचार तर काही वेळा स्वतःला व्यक्त करायचे माध्यम म्हणून नवविचाराच्या कथक कलाकारांनी वस्तूक्रमात, सादरीकरणाच्या चौकटीत बदल करायचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु कला-प्रशिक्षणाचा विचार ह्या नव्या चौकटीत मुलींच्या वाढीच्या वयात तंत्र आत्मसात करण्याकडेच जास्त कललेला दिसतो. वाढीच्या वयात विकसित होत जाणारी तंत्रावरील हुकमत, सादरीकरणातील सफाई, आधुनिक तंत्रज्ञानाची जाण, बदललेली गुरु-शिष्य परंपरा आणि विद्यापीठीय अभ्यासक्रम ह्यांच्या सरमिसळीतून आजचे कला-प्रशिक्षण विकसित होत गेलेले दिसते. आज हे प्रशिक्षण घेणाऱ्या मुली आपल्या गुरूंकडे परंतु अभ्यासक्रमावर आधारित प्रशिक्षण घेतात त्याला फक्त व्यवसायभिमुकता एवढाच उद्देश नसतो.

आज दिसणारे कथकचे स्वरूप हे कलेविषयीचे सरकारी धोरण, संगीत नाटक अकादमी, दूरदर्शन, ह्यांचे जलसे, शिष्यवृत्या, विद्यापीठीय अभ्यासक्रम आणि भारतभर शहरातून,/गावातून चालवले जाणारे छोटे छोटे नृत्य वर्ग, ह्यांच्या एकत्रित प्रयत्नातून बदललेले दिसते. स्वातंत्र्यानंतर अनेक नर्तकींनी/शिक्षिकांनी/अभ्यासकांनी जुन्या ग्रंथांचे दाखले घेऊन त्यातील कथकचे आयाम मुद्दाम प्रयत्नपूर्वक पुनरुज्जीवित केले आणि कथकला राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक प्रतिष्ठा दिली. आज दिसणारे कथक नृत्य घराणेदार कलाकारांचा बदलता दृष्टीकोन, विविध प्रांतांची लोककला, कलेच्या अभ्यासक्रमाचे साधारणीकरण, बदलत्या सामाजिक जाणीवा, आधुनिक तंत्रज्ञान ह्यांच्या एकत्रित कारणाने पुनरुज्जीवित झाले आहे.(६)

आज पुण्याच्या विविध भागात अनेक छोट्या/मोठ्या नृत्यवर्गातून कथक नृत्य शिकणाऱ्या मुलींच्या संख्येचा विचार करता, मुलींचे/पालकांचे/शिक्षकांचे कष्ट, त्यातील आर्थिक गणिते, त्याचे सामाजिक परिणाम, ह्या

कलाव्यवहाराचा(गौरी वनारसे) उद्देश आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यातून मुलींना मिळणारे वैयक्तिक फायदे/तोटे हा संशोधनाचा विषय ठरू शकतो.

### व्यक्ती-विकासाचा बदलता आलेख-

युरोप मध्ये १७/१८ च्या शतकात विज्ञान आणि गणित ह्यात वेगवेगळे शोध लागायला लागले. कोपर्निकस, गलिलिओ ह्यांनी पृथ्वीचे परिभ्रमण आणि ब्रह्मांडातील स्थान ह्या शोधामुळे वैज्ञानिक क्रांती केली त्यामुळे चर्चच्या धर्म संस्थेला आव्हान दिले गेले. ह्या वैज्ञानिक प्रगतीमुळे विज्ञान, गणित आणि कला हि क्षेत्रे ढवळून निघाली. औद्योगिक क्रांती, स्त्रीशिक्षण ह्यामुळे फक्त पाश्चिमात्य देशातच नाही तर भारतातही राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक परिसरात बदल होत गेले. भारताचा विचार केला तर ब्रिटीश वसाहतीच्या संपर्कामुळे व्यक्ती विकासाच्या विचारात, संकल्पनेत बदल होत गेले. शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल झाला. संवेदनशीलता आणि मानवी कौशल्ये ह्यापेक्षा बुद्धीला दिसणारी माहिती जास्त महत्वाची वाटू लागली. बौद्धिक विकास हा अग्रक्रमावर आला. हंटर कमिशनने भारतीय शिक्षण पद्धतीची प्रतिष्ठा नाकारली आणि आपली पूर्ण शिक्षणप्रक्रिया बदलली. व्यवसायाची निवड हा वैयक्तिक पातळीवरचा व्यक्तिगत मुद्दा झाला.

त्यानंतर २१ व्या शतकात आलेल्या जागतिकीकरणाने पुन्हा एकदा नव विचार आले. आज प्रत्येक व्यक्ती आपल्या सोयीस्कर पारंपारिक चौकटींना नव्याने बांधून घेऊन जागतिक पातळीवर जाण्याचा प्रयत्न करू लागली आहे. ह्या प्रयत्नांमुळे कल्पकता आणि कौशल्य आत्मसात करायची प्रक्रिया पुन्हा एकदा बदलली. त्याला 'जागतिकता तरीही वैयक्तिकता' (७) अशी आंतर्विरोधी भूमिका आली. बुद्धिमत्तेची व्याख्या बदलली त्यामुळे मुलांच्या संगोपनाचा विचार बदलला. घराबाहेरील संस्थांकडून मुलांचे संगोपन करून घेण्याची पालकांना गरज भासू लागली(श्यामला वनारसे). फक्त शालेय पुस्तकी बैठे ज्ञान ह्या वाढलेल्या गरजांना पुरेसे नाही, त्यासाठी शालेय अभ्यासाला पूरक, आपल्या पाल्याच्या आवडीचा एखादा छंद विचारपूर्वक निवडायचा आणि तो विकसित करायची संधी त्याला द्यायची हा विचार समाजात रूढ होऊ लागला. नृत्यकलेसारखी सर्वसमावेशक कला त्यासाठी उपयुक्त आहे हा पाश्चात्य विचार आपल्याकडे रुजायला लागला(८) त्यासाठी पुन्हा आपल्याच जुन्या कलांकडे ह्या नव्या आयामातून बघायचे, त्यामागील तत्वज्ञान, कलेतील कौशल्य, कल्पकता वैयक्तिकरित्या आत्मसात करायची आणि जागतिक पातळीवरच्या स्पर्धेत टिकायचे ह्या विचाराचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे सामाजिक पातळीवर कलेचे संदर्भ आणि अर्थ बदलत गेले. ह्यामुळे वंशपरंपरेने चालत आलेल्या, सादरीकरणाला प्राधान्य देणाऱ्या कथक नृत्याचा अभ्यास छंद म्हणून आज सर्वसामान्य मुलीहि म्हणून करू लागल्या. म्हणजेच कलेच्या उपयोजितेचा विचार आजच्या सामाजिक पातळीवर केला जात आहे. आज भारतातील विविध शहरातील/गावातील मुलींचे पालक आपल्या पाल्याला नृत्यवर्गातून शिकण्यासाठी पाठवतात (९) त्यात आपल्या पाल्याचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास व्हावा हि सजगता / प्रेरणा दिसून येते. आजच्या कथकनृत्य शिक्षिकांसमोर हे मोठे आव्हान आहे.

### उपसंहार-

कथक नृत्यकला प्राचीन काळापासून अनेक स्थित्यंतरातून विकसित होत गेलेली आणि आज स्वायत्तपणे सादर केली जाणारी कला आहे. त्या विकासाचा मार्ग बघता आज कला-प्रशिक्षणाचे आयाम /स्वरूप निश्चित बदलत आहे. कलेचा सामाजिक उपयोग मनोरंजनात्मक असावा शिवाय शिकणाऱ्याच्या विकास प्रक्रियेचाही त्यात समावेश असावा हि धारणा वाढते आहे. कलेतून बदलाची गरज जाणवून देणारी संवेदनशीलता तयार होते(१०). कलेच्या कलात्मक सौंदर्याच्या अभ्यासाने आयुष्याची प्रगल्भता वाढायच्या शक्यता दिसतात. म्हणूनच असे म्हणायला संधी आहे कि,
आजच्या कथकनृत्यकला शिक्षणाचा व्यक्तिमत्व विकासाशी थेट संबंध आहे.

### तळटीपा-

१) दधीच, पुरू, (२००४),कथक नृत्य शिक्षा,द्वितीय भाग,(तृतीय आवृत्ती ), बिंदू प्रकाशन, इंदौर. ( पान क्र. ६९,८३)

२) देव, मंजिरी, (२३ ऑक्टो,२००६), नृत्य सौरभ,(तृतीय आवृत्ती), डॉ.मंजिरी श्रीराम देव, ठाणे.

३) डॉ. अनुपमा कैलाश, The Guru tradition - Various facets

४) आनंद कुमारस्वामी,(१९१७),

५)Walker,Margaret, Revival and Reinvention in India's *Kathak* Dance

६) Katarzyna Skiba, performing the sacred in kathak dance

७) काळे, भानू, बदलता भारत, (२२ एप्रिल २००६),द्वितीय आवृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई

८) वात्सायन, कपिला, Education through the Arts: Values and Skills

९) Edward C.Warburton, Article of meanings and movements:re-languageing embodiment in dance: Phenomenology and cognition

१०) वनारसे, श्यामला, प्रबोधन काल-आज-उद्या,(१३ नोव्हेंबर २०१७),वंचित विकास, पुणे,(पान क्र: ३२)

## संदर्भ सूची-

दधीच, पुरू, (२००४),कथक नृत्य शिक्षा,द्वितीय भाग,(तृतीय आवृत्ती ), बिंदू प्रकाशन, इंदौर.

काळे, भानू, बदलता भारत, (२२ एप्रिल २००६),द्वितीय आवृत्ती, मौज प्रकाशन, मुंबई

देव, मंजिरी, (२३ ऑक्टो,२००६), नृत्य सौरभ,(तृतीय आवृत्ती), डॉ.मंजिरी श्रीराम देव, ठाणे.

वनारसे, श्यामला, प्रबोधन काल-आज-उद्या,(१३ नोव्हेंबर २०१७),वंचित विकास, पुणे,(पान क्र: ३२)

वात्सायन, कपिला, Education through the Arts: Values and Skills

आनंद कुमारस्वामी,(१९१७),

Walker, Margaret, Revival and Reinvention in India's *Kathak* Dance

Katarzyna Skiba, performing the sacred in kathak dance

Edward C.Warburton, Article of meanings and movements: re-languageing embodiment in dance: Phenomenology and cognition

Chakravorty,Pallabi, Dance, Pleasure and Indian Women as Multisensory Subjects

Walker, Margaret, Courtesans and Choreographers: The (Re)Placement of Women in the History of *Kathak* Dance

आपटे,माधुरी, पंडित गोपीकृष्ण यांची कथक नृत्यशैली : एक अभ्यास

Paul, Sriradha **,Effects of technology on Indian Classical Dance**

पं- बिरजू महाराज अध्यासन केंद्रातर्फे घेतलेल्या.'मला उमजलेले पंत्यांची नृत्य शैली अर्थात-बिरजू महाराजजी .'

Purva Pandit Shreevas**, Recent teaching techniques in Classical Dance**

**Das, Dreamsea, Educational Philosophy of Rabindranath Tagor** *Katarzyna Skiba*, **Cultural Geography of Kathak Dance: Streams of Tradition and Global Flows***